**शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग, पुणे**
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२२२१७ ,ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०४/एनएसएस/पुवि/१७
दि :- 24 NOV 2017

प्रति,

**प्राचार्य,**

**राष्ट्रीय सेवा योजना +२ युनिट असणारे कनिष्ठ महाविद्यालय**
**/ उच्च माध्यमिक विद्यालय, पुणे/अहमदनगर/सोलापूर**

**विषय :- राष्ट्रीय सेवा योजना +२ अंतर्गत विभागस्तरीय नेतृत्व विकास शिबिर आयोजनाबाबत**

**संदर्भ :-१) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे यांनी दिलेल्या सूचनेनुसार**
**२) या कार्यालयाचे पत्र दिनांक १४.११.२०१७**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार शिक्षण उपसंचालक पुणे विभागागस्तरावर राष्ट्रीय सेवा योजना +२ अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी ०३ दिवसांचे नेतृत्व विकास शिबिर आयोजित करण्याबाबत मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे यांनी सूचित केलेले आहे. त्यानुसार पुणे/अहमदनगर/सोलापूर या जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालय / उच्च माध्यमिक विद्यालयांमधील एकूण ५५ राष्ट्रीय सेवा योजना +२ युनिट मधील प्रत्येकी ०२ विद्यार्थी, जिल्हा समन्वयक, विभाग समन्वयक व इतर असे एकूण १५० शिबिर्थीसाठी यांचेसाठी दिनांक **२३.११.२०१७ ते २५.११.२०१७ अखेर शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलुज ता. माळशिरस जि. सोलापूर** या ठिकाणी सदर शिबिर आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

तरी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील सदर युनिट मधील ०१ विद्यार्थी व ०१ विद्यार्थीनी यांना शिबिरासाठी पाठविण्याची व्यवस्था करावी, सदर विद्यार्थ्यांचा प्रवास खर्च संबधित कनिष्ठ महाविद्यालयाने करावयाचे आहे, सदर विद्यार्थ्यांचे हमीपत्र व पालकांचे समंतीपत्र विहित नमुन्यामध्ये प्राचार्यांनी कार्यालयीनस्तरावर भरुन घ्यावेत. सदर शिबिरामध्ये सहभागी होणा-या सर्व विद्यार्थ्यांची जबाबदारी संबधित जिल्हा समन्वयकांची असणार आहे, सर्व विद्यार्थी जिल्हा समन्वयक यांचेसमवेत शिबिरामध्ये सहभागी होतील.

तसेच सर्व कार्यक्रम अधिकारी यांनी शिबिरामध्ये निवासी येण्याची आवश्यकता नाही. सदर शिबिर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विभाग समन्वयक, जिल्हा समन्वयक व कार्यक्रम अधिकारी यांनी सहकार्य करावे.

MBRaut
**(मिनाक्षी राऊत)**
**सहा. शिक्षण संचालक ,**
**पुणे विभाग,पुणे-१**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**
**१) मा. आयुक्त (शिक्षण) म.रा. पुणे-१**
**२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च ) म.रा.-१.**
**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी**
१) प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर पुणे २) प्राचार्य, बंडोजी खंडोजी कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ३) प्राचार्य, चंदनेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, चंदनापुरी ता. संगमनेर जि. पुणे यांना कळविण्यात येते की, आपल्या कनिष्ठ महाविद्यालयतील शिक्षक व राष्ट्रीय सेवा योजना विभाग समन्वयक व जिल्हा समन्वयक यांना सदर शिबिराच्या नियोजनासाठी आवश्यकतेनुसार कार्यमुक्त करावे.
२) श्री. सांबारे, राष्ट्रीय सेवा योजना विभागस्तर समन्वयक पुणे विभाग पुणे व श्री. सुर्यवंशी व श्री. रहाणे, जिल्हा समन्वयक, पुणे /अहमदनगर यांना कळविण्यात येते की, सदर शिबिरासाठी आपण व्यक्तिशः उपस्थित राहुन यशस्वीरित्या शिबिर पार पाडण्याची कार्यवाही करावी.
३) सर्व कार्यक्रम अधिकारी , सदर शिबिर यशस्वी होण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही आपल्यास्तरावरुन करावी.



TAKRAR LETTER